www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४८ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# अतिक्रमण विरोधी मोहिम नाही ही तर दडपशाही मोहिम

## पाच दिवसात भूमिका जाहीर करा अन्यथा पाच दिवसांनंतर महापालिका आयुक्त तथा प्रशासकांना रस्त्यावरुन फिरु देणार - सामाजिक कार्यकर्ते विनोद पाटील यांचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

रस्ता रुंदीकरणासाठीच्या पाडापाडीत बाधित झालेल्या मालमत्ताधारकांची यादी आणि त्यांना मोबदला केव्हा देणार या बद्दल पाच दिवसात भूमिका जाहीर करा अन्यथा पाच दिवसांनंतर महापालिका आयुक्त तथा प्रशासकांना रस्त्यावरुन फिरु देणार नाही असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विनोद पाटील यांनी सोमवारी (१८ ऑगस्ट) पत्रकार परिषदेत दिला.

विनोद पाटील म्हणाले, रस्ता रुंदीकरणाला किंवा शहराच्या विकासाला आमचा विरोध नाही. महापालिका प्रशासनाने आवश्यक ती प्रक्रिया पार पाडून रस्त्यांचे रुंदीकरण करावे. रस्ता रुंदीकरणात ज्या मालमत्ता पाडण्यात येणार आहेत किंवा पाडण्यात आल्या आहेत त्या मालमत्तांचा पंचनामा करावा. बाधितांना रितसर मोबदला द्यावा. मोबदला रोखीनेच मिळावा, त्यासाठी टीडीआरची सक्ती करण्यात येऊ नये, ज्यांना टीडीआर घ्यायचा असेल ते टीडीआर घेतील. सर्वसामान्यांना रोखीनेच मोबदला मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. महापालिकेने ही प्रक्रिया केलेली नाही. मनमानी पध्दतीने पाडापाडी करण्यात आली आहे. या बद्दल आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती. मुख्यमंत्र्यांनी तक्रारीची दखल घेत महापालिका आयुक्तांना नियमानुसार कारवाई करण्याचे आणि आतापर्यंत करण्यात आलेली कारवाई तपासण्याचे आदेश दिले आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार पालिका आयुक्त तथा प्रशासकांनी कारवाई करावी. रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या मालमत्ताधारकांनी यादी पाच दिवसात प्रसिध्द करावी, त्यांना मोबदला केव्हा देणार हे स्पष्ट करावे. असे न केल्यास पाच दिवसानंतर प्रशासकांना रस्त्यावरुन फिरू देणार नाही, पाडापाडी देखील करु देणार नाही असा इशारा त्यांनी दिली.

लोकं जाब विचारतील - रस्ता रुंदीकरणासाठी करण्यात आलेली पाडापाडी, त्यात नागरिकांचे झालेले नुकसान, त्यांना न मिळालेल्या मोबदला या बद्दल लोकप्रतिनिधी अद्याप कोणतीच भूमिका घेतली नाही. त्यांनी भूमिका का घेतली नाही याचा जाब लोकं महापालिका निवडणूकीत लोकप्रतिनिधींना विचारतील असे विनोद पाटील म्हणाले.





## पीडित नागरिकांना आर्थिक मोबदला द्या, मुख्यमंत्र्यांचे निर्देश

महापालिकेच्या अनधिकृत कारवाईविरोधात नागरिकांना मोठा दिलासा मिळालेला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये महापालिकेनं नकाशा न पाहता आणि कोणतीही नोटीस न देता बांधकामं पाडल्याच्या नागरिकांच्या तक्रारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत विनोद पाटील यांनी पोहोचवल्या.



या गंभीर बाबींवर जवळपास ५० मिनिटे सविस्तर चर्चा झाल्यानंतर, खुद्द मुख्यमंत्री साहेबांनी महापालिका आयुक्तांना चौकशीचे आदेश दिले आहेत. फक्त चौकशीच नव्हे तर या कारवाईत नुकसान झालेल्या सर्व पीडित नागरिकांना आर्थिक मोबदला द्या, असे थेट निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

आमचा विकासाला विरोध नाही, पण अन्यायाने उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना न्याय मिळालाच पाहिजे, हा ठाम आग्रह विनोद पाटील यांच्याकडून मांडण्यात आला होता. मुख्यमंत्री महोदयांनी तत्काळ प्रतिसाद देत नागरिकांच्या न्यायाच्या मागणीला हिरवा कंदील दाखवला.

यामुळे आता पीडितांना दिलासा मिळणार असून, त्यांच्या उभारीसाठी सरकारने पुढाकार घेतल्याचं स्पष्ट होत आहे. प्रत्येक संकटग्रस्त नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून, न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असा विश्वास विनोद पाटील यांनी भेटीनंतर व्यक्त केला.

# एन-७ सिडको अयोध्यानगरसह संपूर्ण परिसरातील पिसाळलेल्या कुत्र्याची दहशत!

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पिसाळलेल्या कुत्र्याने रविवारी सिडको एन-७ परिसरात १४ जणांना चावा घेतला. घटनेमुळे या भागात या कुत्र्याची दहशत पसरली आहे. नागरिकांनी जखमींना उपचारासाठी घाटीत दाखल केले. दरम्यान, पिसाळलेल्या कुत्र्याला पकडण्यासाठी मनपाच्या पशुसंवर्धन विभागाला माहिती देऊन रात्री उशिरापर्यंत पथक पोहोचलेले नव्हते. त्यामुळे हा कुत्रा अजूनही मोकाट आहे. एन-७ मधील मुकुल मंदिर परिसरात दुपारी ४ वाजता पिसाळलेला कुत्रा नागरिकांना चावा घेत सुटला. यामध्ये लहान मुले, महिला आणि ज्येष्ठांचा सहभाग आहे. चावा घेतलेल्यांची संख्या १४ जणांवर जाऊन पोहोचली. नागरिकांना काही कळण्याच्या आतच तो दुसऱ्याला चावा घेऊन पळून जात होता. या भागातील रहिवासी रवींद्र तांगडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कुत्र्याने चावा घेतलेल्या नागरिकांना तातडीने मिळेल त्या वाहनाने घाटीत उपचारासाठी दाखल केले.



## भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा; मनपा प्रशासक जी.श्रीकांत यांना रविंद्र कृष्णा तांगडे यांच्यावतीने निवेदन

एन-७ सिडको आयोध्यानगर संपूर्ण परिसरातील पिसाळलेले व मोकाट कुत्र्यांविषयी मनपा प्रशासक जी.श्रीकांत यांना रविंद्र कृष्णा तांगडे यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. दिनांक १७/८/ २०२५ रविवार रोजी एन-७ सिडको परिसरात सायंकाळी चार ते आठ वाजे दरम्यान लहान मुले,महिला, वयोवृद्ध पुरुष असे एकूण १४ जणांना पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतला.

त्याचबरोबर एन-७ सिडको मुकुंद मंदिर शाळेलगत,पोलीस कॉलनी, सि-१,सि-२ आयोध्यानगर येथील राम मंदिर, महादेव मंदिर, राधाकृष्ण मंदिर, जी-१ त्रिवेणीनगर,बि-१ सिडको, ग्रिव्हुज कॉलनी,छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ स्मारक परिसर अशा बहुतांश परिसरामध्ये या पिसाळलेल्या कुत्र्याने ३० ते ३५ कुत्र्यांना चावा घेतला भविष्यामध्ये हे सर्व कुत्रे पिसळण्याची संभावना आहे. तरी या सर्व परिसरात परिसरामध्ये मुकुंद मंदिर शाळा, जिगीशा शाळा,रमाबाई आंबेडकर शाळा, महानगरपालिका शाळा,सिडको पोलीस स्टेशन,गरवारे कम्युनिटी सेंटर असे वदर्ळ असलेला परिसर आहे. परिसरातील पिसाळलेल्या कुत्र्याने ज्या कुत्र्यांना चावा घेतला भविष्यामध्ये सर्व कुत्रे जर पिसाळले तर खूप मोठी मानव आणि होऊ शकते,त्यामुळे सिडको परिसरातील सर्व नागरिक दहशतीखाली आहेत मुलांना शाळेत पाठवायचे की नाही असे विचार करत आहे तरी मा. प्रशासक साहेब आपण एन-७ सिडको येथील जेवढे कुत्रे आहे त्यांना वैद्यकीय चाचणीसाठी घेऊन जाण्या साठी संबंधित विभागाला आपण आदेशात करावे ही नम्र विनंती असे निवेदनामध्ये म्हटले आहे. नाहीतर भविष्यामध्ये होणाऱ्या मानवहानीला मनपा प्रशासन जबाबदार राहणार.

## संभाजीनगरातील पदमपुरा ते समर्थनगरपर्यंत मद्यधुंद कारचालकाने ६ जणांना उडवले

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्राचार्यपद रद्द केलेल्या शंकर अंभोरे याचा मुलगा संकेत शंकर अंभोरे याने मद्यधुंद अवस्थेत ५ ते ६ जणांना धडक दिली. अशी माहिती पोलिसांनी दिली. हा प्रकार रविवारी (१७ ऑगस्ट) रात्री ८ ते ९ वाजेच्या दरम्यान पदमपुरा ते समर्थनगर भागात घडला. त्यानंतर संतप्त नागरिकांनी त्याला कारमधून बाहेर ओढून आधी चोप दिला. नंतर क्रांती चौक पोलिसांच्या स्वाधीन केले. यात अनसाबाई भगीरथ बरंडवाल (४८, रा. पदमपुरा) या जखमी झाल्या. तसेच एक १२ वर्षांची मुलगी गंभीर जखमी झाली. त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर क्रांती चौक पोलिस ठाण्यात तक्रारदारांची गर्दी झाली होती.

कारच्या (एमएच २० एफपी ९०६६) चालकाने आठ वाजेच्या सुमारास पदमपुरा भागात पायी जाणाऱ्या बरंडवाल यांना उडवले. यात त्या जखमी झाल्यावरदेखील तो त्या ठिकाणी थांबला नाही. त्याने भरधाव वेगाने गाडी रिव्हर्स घेऊन अन्य लोकांना उडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आजूबाजूला असलेल्या नागरिकांनी त्या कारचा पाठलाग सुरू केला. मात्र प्रचंड वेगात असल्याने तो पसार झाला. मात्र तरुणांनी त्याचा पाठलाग केला

**संतप्त नागरिकांकडून चोप**

पदमपुरा भागात धडक दिल्यानंतर कार पंचवटी चौकात एका दुचाकीला धडकली. तेथून पुढे त्याने समर्थनगरात दोघांना धडक दिली. तेथे गर्दी व रस्ता लहान असल्याने त्याला गाडी काढता आली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी त्याच्या कारमधून बाहेर ओढत चोप दिला. तोवर पदमपुऱ्यातील तरुण तेथे पोहोचले, त्यांनी त्याला पाहिल्यावर व इतराना घटनाक्रम सांगितल्यावर त्याला चोप दिला.

**कारचालक तरुण नशेत तर्र...**

**काय घडतेय, नव्हते भान**

या वेळी तरुण नशेत इतका तर्र होता की त्याला नेमके काय सुरू आहे, याचे काहीही भान नव्हते. त्यास नागरिकांनी क्रांती चौक पोलिसांच्या स्वाधीन केले. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, समर्थ नगर परिसरातील नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार त्याने या परिसरातून तीन ते चार वेळा चकरा मारल्याचे सांगितले.

संपादकीय

# क्रेडिट कार्डबद्दल ग्राहकांच्या अपेक्षा

आजच्या तरुणाईला कॅशलेस व्यवहार फारच सोईचे आहेत असे वाटते. त्यामुळे क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, जी-पे (ऋ रि्), पेटीएम इत्यादींचा वापर सर्रास होताना दिसतोय. यात सोय आहे हे मान्य केले तरी या व्यवहारांची नीट माहिती करून नाही घेतली, तर फसगत होण्याची शक्यता आहे. फसगत झालीच, तर तक्रार कुठे आणि कशी करता येते, पाठपुराव्यानेच कशी सोडवता येते यासाठी घेतलेला आढावा.

हे प्रकरण आहे नवी दिल्ली येथील. पराग हे एचडीएफसी (कऊऋउ) बँकेचे क्रेडिट कार्डधारक. गेली १० वर्षे अगदी वेळेवर क्रेडिट कार्डाचे बिल भरणारे ग्राहक. ३० मार्च २०१४ रोजी रात्री १२.४२ ते १२.५६ या दरम्यान कोणीतरी पराग यांच्या क्रेडिट कार्डावरून एकूण २४ हजार रुपयांचे वेगवेगळे व्यवहार केले. या व्यवहारांबाबत एचडीएफसी बँकेच्या टीमकडून पराग यांना पुष्टीकरण (लेपषळीरींळेप) कॉल आला. पराग यांनी आपण असे व्यवहार केल्याला नकारार्थी उत्तर दिले. दुसऱ्या दिवशी सकाळीच पराग यांनी हा वादग्रस्त व्यवहार जाणून घेण्यासाठी एफडीएफसी बँकेच्या ग्राहक सेवेशी संपर्क साधला. त्यांना बँकेने वादविवाद (वळीििंश) फॉर्म पाठवण्याची विनंती केली. तो फॉर्म पाठवल्यावर बँक हा व्यवहार उलट करून पराग यांचे पैसे परत करेल असेही सांगितले. नंतर त्यांना बँकेकडून अजून एक, फोनद्वारे पोलीस तक्रारीची प्रतही पाठवण्यास सांगितले. पोलीस तक्रार केल्याची प्रत पाठवल्यावर तीन दिवसांनी पराग यांना प्रोग्रेसिव्ह डिस्प्युट फॉर्म पाठवण्यास सांगितले गेले. तोही त्यांनी पाठवला. सर्व औपचारिकता पूर्ण करूनही बँकेने तो व्यवहार उलट केलाच नाही. तर पराग यांना ते पैसे भरावे लागतील असे सांगितले. शेवटी नाईलाजाने पराग यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे तक्रार दाखल केली.

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचात त्यांची तक्रार फेटाळली गेली. त्यामुळे पराग यांनी या निर्णयाविरुद्ध राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली. पण गुन्हेगारी स्वरूपाच्या वादांशी संबंधित मुद्दे ग्राहक संरक्षण कायद्याच्या तरतुदीनुसार संक्षिप्त खटल्यांतर्गत हाताळले जाऊ शकत नाहीत, असे निरीक्षण नोंदवून राज्य आयोगानेही जिल्हा मंचाचा आदेश कायम ठेवला. काहीही चूक नसताना हकनाक २४ हजार रुपयांचा भुर्दंड सहन करायला पराग तयार नव्हते. त्यांनी राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे पुनर्विचार याचिका दाखल केली. त्या अर्जात त्यांनी आरबीआयच्या एका परिपत्रकाचा उल्लेख केला. यात स्पष्ट म्हटले आहे की, जर ग्राहकाने ऑनलाईन गैरवापर किंवा फसवणूक व्यवहाराची माहिती १० दिवसांच्या आत बँकेला दिली तर ग्राहक ती रक्कम भरण्यास जबाबदार नाही. पराग यांनी फसवणुकीच्या व्यवहाराची माहिती बँकेला १० मिनिटातच दिली होती. त्यामुळे त्यांनी अर्जात ही रक्कम भरण्यास मी जबाबदार नाही असे स्पष्ट लिहून दिले. माझ्या क्रेडिट कार्डद्वारे मी जी रक्कम वापरली त्याचा भरणा मी वेळेवरच केला आहे असेही त्यांनी दाखवून दिले. राष्ट्रीय आयोगाने असे म्हटले की हे प्रकरण फसवणुकीचे किंवा फौजदारी खटल्याशी संबंधित आहे. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत खटला चालवता येणार नाही. तथापि सेवा देणाऱ्याने अर्थात बँकेने सेवेत कमतरता दाखवली असेल तर ग्राहक मंचाला या प्रकरणाची तपासणी करण्याचे अधिकार आहेत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम २(१) (ओ)अंतर्गत बँकिंग सेवेला सेवा म्हणून समाविष्ट केलंय. तक्रारदार हा एफडीएफसी बँकेने जारी केलेल्या क्रेडिट कार्डाचा वापरकर्ता आहे. गेली १० वर्षे तो क्रेडिट कार्डाचे बिल नियमितपणे वेळेवर भरतोय. तो ग्राहकाच्या व्याख्येत येतो आणि ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राहक न्यायालयात तक्रार दाखल करण्याचा त्याला अधिकार आहे.

राष्ट्रीय आयोगाने आरबीआयने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचाही संदर्भ दिला. या सूचनेनुसार बँकेकडून योगदानात्मक फसवणूक किंवा सेवेत कमतरता होऊन अनधिकृत व्यवहार झाल्यास ग्राहकाची जबाबदारी शून्य असेल. या सूचना तृतीय पक्षाच्या उल्लंघनाचीही काळजी घेतात. कमतरता बँकेत किंवा ग्राहकात नसून सिस्टिममध्ये इतरत्र आहे, असे आढळल्यास अशावेळी ग्राहकाने अशा व्यवहारांची माहिती ३ कामकाजाच्या दिवसांत बँकेला दिली, तर ग्राहकाची जबाबदारी शून्य असेल. या प्रकरणात पराग यांनी त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या सर्व उपाययोजना केल्या. त्यांच्या क्रेडिट कार्डाचा वापर कोणीतरी फसवणुकीने केला होता. याबाबत पराग यांचा कोणताही निष्काळजीपणा झाला नसल्याचे आयोगाच्या चौकशीत आढळून आले. राष्ट्रीय आयोगाने राज्य आयोग आणि जिल्हा मंचाचे आदेश रद्द ठरवले. एचडीएफसी बँकेला असा आदेश दिला की जर पराग यांना बँकेने २४ हजार रुपये भरायला लावले असतील, तर ते ताबडतोब भरलेल्या दिवसापासून वार्षिक ७% दराने दंडासहित परत करावेत. तसेच खटल्याचा खर्च म्हणून दहा हजार रुपये त्यांना द्यावा. हा निर्णय आहे डिसेंबर २०२३ चा, म्हणजे तब्बल ९ वर्षांनी पराग याना न्याय मिळाला. बघितलत मंडळी. आपली चूक नसूनही एवढी वर्षे लागली न्याय मिळवण्यासाठी. तरीही नेटाने पाठपुरावा करून पराग यांनी पैसे आणि मानसिक समाधान दोन्ही मिळवले. एक सजग ग्राहक म्हणून हे अत्यंत आवश्यक आहे, नाही का?

# पूर्ण स्वातंत्र्याची मागणी लावून धरणारे-सुभाषचंद्र बोस

**सुभाषबाबूंचे एकूण जीवनच देशभक्त क्रांतिकारकाचे व म्हणून रोमांचकारी आहे. परदेशात जाऊन इतर मित्रराष्ट्रांच्या साह्याने त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले, हे त्यांच्या धडाडीचे, संघटना कौशल्याचे, समयसूचकतेचे व मुत्सद्देगिरीचे निदर्शक आहे. दास्यमुक्तीसाठी आणि नंतरच्या प्रगतीसाठी त्यांनी अनेक योजना आखल्या आणि त्या कार्यवाहीत आणण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले. प्रकृतीची पुरेशी साथ नसतानाही त्यांनी उपोषण-निदर्शनांपासून सशस्त्र युद्धापर्यंतचे सर्व मार्ग आचरणात आणले. त्यासाठी त्यांनी म. गांधीपासून स्वातंत्र्यवीर वि. दा.सावरकरांपर्यंतच्या सर्व नेत्यांचे प्रसंगोपात्त सहकार्य स्वीकारले. प्रेरणादायी संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक**



## (१८ ऑगस्ट:नेताजी सुभाषचंद्र बोस पुण्यस्मरण)

नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते आणि आझाद हिंद सेनेचे सरसेनापती. 'नेताजी' ही त्यांना लोकांनी दिलेली उपाधी. सुभाषबाबूंचे घराणे मूळचे माहिनगर, बंगालचे. त्यांचे वडील जानकीनाथ वकिलीच्या व्यवसायानिमित्त कटक,ओरिसाला आले. तेथेच सुभाषचंद्रांचा जन्म दि.२३ जानेवारी १८९७ रोजी झाला. आई प्रभावतीदेवींनी बालवयात त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाचे आहेत. रॉवेंशा विद्यालयाचे मुख्याध्यापक बेनी माधवदास यांचाही त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. सुभाषबाबूंवर स्वामी रामकृष्ण आणि विवेकानंद यांचा फार मोठा प्रभाव शाळेत असतानाच पडला होता. दोघांच्या अनेक ग्रंथांचे वाचन त्यांनी तेव्हा केले होते. मिशन शाळेत गोऱ्या व हिंदी विद्यार्थ्यांमध्ये करण्यात येणारा भेदाभेद आणि विवेकानंदांचे लिखाण यांमुळे राष्ट्रप्रेम निर्माण झाले व पुढे गोऱ्यांच्या उद्दाम वर्तनाचे उदा., प्रा.ओटन प्रसंग अधिकाधिक घडले तसतसे ते वाढत गेले. याउलट विवेकानंद-रामकृष्णांच्या ग्रंथांमुळे त्यांना अत्यंत उत्कट अशी धार्मिक ओढ वाटू लागली. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच ते कटक आणि नंतर कलकत्त्याला भेटणाऱ्या साधू, बैरागी, योगी इत्यादींना प्रश्न विचारून त्यांच्याकडून आपल्याला खरा मार्ग सापडेल का, याचा शोध घेऊ लागले. ध्यान, हटयोग यांतही त्यांना गोडी वाटू लागली. विषयासक्तीवर पूर्ण नियंत्रण मिळवून साक्षात्कार प्राप्तीचा मार्ग दाखविणारा कोणी गुरू त्यांना या दोन्ही शहरांत भेटला नाही. कॉलेजमधील पहिले वर्ष संपल्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत सतराव्या वर्षी ते आणि त्यांच्यासारखे त्यांचे चारपाच मित्र गुरूच्या शोधार्थ निघाले. गया, काशी, हरद्वार, हृषिकेश, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा इ. ठिकाणी ते सर्वजण हिंडले; परंतु हवा असलेला गुरू तर मिळाला नाहीच उलट तीर्थक्षेत्री जातिपातीचे प्रस्थ, शिवाशीव इ.पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. विवेकानंदांच्या शिकवणुकीने त्यांची मानवाच्या समानतेवरील श्रद्धा दृढ झाली.

प्रा.ओटन यांच्या व तशाच एका गोऱ्या प्राध्यापकाच्या उर्मट वर्तवणुकीने अपमानित झालेल्या प्रेसिडेंट कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हरताळ पुकारला. त्याचे नेतृत्व स्वीकारणे सुभाषबाबूंना भाग पडले. पुढील आयुष्याचे वळण लागण्याची ही नांदी होती; पण या प्रकरणी त्यांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले. पुढे अशुतोष मुखर्जींच्या मदतीने त्यांना स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये सन १९१७मध्ये प्रवेश मिळाला. ते तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिल्या वर्गात बीए १९१९ला झाले. त्याच वर्षी वडिलांच्या इच्छेनुसार ते आयसीएससाठी इंग्लंडला गेले. त्या वेळी असहकार आंदोलन सुरू झाले नव्हते. जालियनवाला बाग येथे काय घडले, त्याची पूर्ण कल्पना पंजाब बाहेरच्या लोकांना आली नव्हती. परीक्षेत यश मिळाल्यानंतर हळूहळू सर्व गोष्टी उजेडात आल्या. आंदोलन सुरू झाले, तेव्हा त्यांनी पहिली सक्तीची एक वर्षाची उमेदवारी न करता १९२१साली सरळ नोकरीचा राजीनामा देऊन स्वदेशाची वाट धरली. या वेळी महात्मा गांधींची असहकार चळवळ जोरात होती. त्यांची भेट घेऊन पुढील दिशा समजावून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महात्मा गांधीनीच त्यांना कलकत्त्याला चित्तरंजन दासांकडे सन १९२१मध्ये पाठविले. मृत्यूपर्यंत सु. चार वर्षे सुभाषबाबूंचे राजकीय गुरू चित्तरंजनच होते. या सुमारास इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्सच्या कलकत्त्यामधील आगमनावर बहिष्कार टाकण्याची मोहीम आखण्यात आली. सुभाषबाबूंनी तीत पुढाकार घेतला. त्यात त्यांना चित्तरंजन दासांबरोबर सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. तुरुंगात दासांच्या पुरोगामी विचारांचा सुभाषबाबूंवर फार मोठा परिणाम झाला. कारावासानंतर ते काही दिवस बेंगॉल नॅशनल महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्वराज्य या वृत्तपत्राचे संपादक होते. पुढे चित्तरंजन दास कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाल्यावर सुभाषबाबूंकडे मुख्य अधिकाऱ्याची जबाबदारी आली. ब्रिटिश सरकारने सूडबुद्धीने खोटा आरोप लादून ऑक्टोबर १९२४मध्ये त्यांना स्थानबद्ध केले. बंगाल प्रांतिक परिषदेमध्ये क्रांतिवीर गोपीनाथ सहा (जे पुढे फाशी गेले.) यांचा जाहीर गौरव करण्यात आला होता. परिषदेस स्वतंत्र पक्षाचे म्हणजे कौन्सिलमध्ये काम करणाऱ्या काँग्रेस गटाचे बहुसंख्य लोक होते. त्यांनीच बंगाल कौन्सिलचे कार्य अशक्य करून टाकले होते. त्यांना खच्ची करण्यासाठी फार व्यापक धरपकडी झाल्या व सर्वांवर, दहशतवादी आंदोलनाशी संबंधित असल्याचे आरोप करण्यात आले. सुभाषबाबूंना अलीपूर, बेऱ्हामपूर, कलकत्ता इ. शहरांतील तुरुंगात काही काळ ठेवून पुढे मंडाल्यासही पाठविण्यात आले. कारावासात त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र, मानसशास्त्र इ. विविध विषयांचे वाचन केले. दरम्यान १९२५मध्ये चित्तरंजन दास यांचे निधन झाल्याचे त्यांना समजले. अशक्त प्रकृती व क्षयाचा विकार यांमुळे सुभाषबाबूंना१९२७साली मुक्त करण्यात आले. भारतातील राजकीय परिस्थितीचा सु. सहा महिने अभ्यास करून नंतर ते सक्रिय राजकारणात पडले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेस परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी यूथ लीग स्थापन करून तरुणांना संघटित केले. काँग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही १९२८ला जवाहरलाल नेहरूंबरोबर त्यांची नियुक्ती झाली. दोघांनी मिळून इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना केली. त्याच वर्षी कलकत्ता येथील अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष मोतीलाल नेहरू यांनी वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणारा ठराव काँग्रेस अधिवेशनात मांडला. जवाहरलालसह सुभाषबाबूंनी त्यास विरोध केला आणि पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडावा असे सुचविले. पुढे सन १९३०च्या सविनय कायदेभंगाच्या वेळी सुभाषबाबूंना पुन्हा अटक झाली. गांधी-आयर्विन करारानंतर त्यांची



– संकलन व सुलेखन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

मुक्तता झाली व ते कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाले. भगतसिंग यांची फाशी वाचवू शकत नसल्यामुळे व प्रत्यक्ष काहीच सवलती न मिळाल्यामुळे गांधी-आयर्विन कराराला सुभाषबाबूंनी अत्यंत कडक शब्दांत जाहीर विरोध केला होता. तेव्हापासून महात्मा गांधी व सुभाषबाबूंचे मार्ग भिन्न झाल्यासारखे दिसतात. जानेवारी १९३२ मध्ये सशस्त्र क्रांतिकारक चळवळीशी संबंध जोडून सरकारने त्यांना पुन्हा स्थानबद्ध केले; पण प्रकृतीच्या कारणास्तव तुरुंगातून मुक्त करताना त्यांना देशातून हद्दपार केल्याचे सांगण्यात आले. उपचारासाठी परदेशी जाणे त्यांना भाग होतेच. १९३३-३६ अशी तीन वर्षे ते व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे राहिले. या काळात त्यांनी यूरोपातील राजकीय परिस्थितीचा सर्वांगीण आढावा घेतला. फॅसिझम व साम्यवाद या दोन विचारसरणींतील उपयुक्त गोष्टी एकत्र करून एक नवीन विचारप्रणाली अनुसरावी, असे त्यांचे मत होते. त्यांनी डी व्हॅलेरा, केमाल आतातुर्क अशा नेत्यांना भेटून त्या दृष्टीने चाचपणीही केली. याच यूरोपच्या दौऱ्यात व्हिएन्ना येथे विठ्ठलभाई पटेलांचे सानिध्य त्यांना लाभले (एप्रिल -ऑक्टोबर १९३३). विठ्ठलभाईनी आपल्या मृत्युपत्रामध्ये आपल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून त्यांना नेमले.

हद्दपारीच्या आज्ञेचा भंग करून सुभाषबाबू भारतात आले (१९३६). त्यांना पुन्हा पकडण्यात आले. १९३५ च्या कायद्यान्वये नव्या कौन्सिलच्या निवडणुका झाल्यानंतरच त्यांची मुक्तता करण्यात आली (१९३७). हरिपुरा येथे होऊ घातलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी राष्ट्रीय नियोजन समिती १९३७च्या ऑक्टाबरमध्ये नियुक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी संघराज्यात्मक घटनेचा प्रखर विरोध करून राष्ट्रीय सामर्थ्यवादावर भर दिला. देशाच्या परिस्थितीत काँग्रेसचे धोरण जहाल असावे व काँग्रेसने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा बदलत्या राजकारणात अनुकूल फायदा करून घ्यावा, या उद्देशाने ते अध्यक्षपदासाठी पुन्हा उभे राहिले. महात्मा गांधींच्या विरोधास न जुमानता त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक त्यांनी लढविली व पट्टाभिसीतारामय्या यांचा पराभव करून ते अध्यक्ष झाले (१९३९). आपल्या अध्यक्षीय भाषणात 'सहा महिन्यांत युद्धाचा भडका उडेल', असे भाकित त्यांनी केले. या निवडणुकीमुळे म. गांधी नाराज झाले. त्यांनी हा आपलाच पराभव आहे, असे मानले. बहुसंख्य सभासदांनी गांधीचे नेतृत्व मान्य केल्यामुळे सुभाषबाबूंनी एप्रिलमध्ये अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि मेमध्ये फॉर्वर्ड ब्लॉकची स्थापना करून स्वमताचा प्रचार चालू ठेवला. काँग्रेसने सुभाषबाबूंविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून बंगाल प्रांतिक परिषदेतून त्यांची उचलबांगडी केली व पुढे तीन वर्षे कोणत्याही पक्षीय अधिकारपदासाठी निवडणूक लढविण्यावर त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. १९ आणि २० मार्च १९४० मध्ये फॉर्वर्ड ब्लॉक व किसान सभा यांचे संयुक्त अधिवेशन रामगढ येथे भरविण्यात आले व ६ एप्रिल १९४० पासून राष्ट्रीय आंदोलनाचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर नागपूर (१८ जून १९४० च्या) अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली; परंतु संकल्पित सत्याग्रहाच्या पूर्वीच त्यांना स्थानबद्ध करण्यात आले (२ जुलै १९४०). आपल्याला मुक्त केले नाही, तर अन्नत्याग करू, अशी त्यांनी धमकी दिली. सरकारने त्यांना सोडून त्यांच्या राहत्या घरात नजरकैदेत ठेवले. आपण अध्यात्मसाधना करणार आहोत, असे भासवून त्यांनी एकांतवास पतकरला आणि एक दिवस वेषांतर करून भगतरामसह पेशावरमार्गे काबूल गाठले (२६ जानेवारी १९४१). तेथून ते जर्मनीत गेले. तेथील वास्तव्यात त्यांनी हिंदी लोकांना ब्रिटिशांविरुद्ध लढ्यास प्रवृत्त केले आणि बर्लिन आकाशवाणीवरून ते देशबांधवांना सातत्याने आवाहन करीत राहिले. हिटलरच्या भेटीनंतर निराश न होता त्यांनी पुढे मुसोलिनीची भेट घेतली; तथापि मुसोलिनीची हंगामी सरकार स्थापण्याची सूचना त्यांना एकूण राजकीय परिस्थितीचा विचार करता स्वीकारार्ह वाटली नाही. म्हणून त्यांनी हिंदी लोकांना संघटित करण्यावर भर दिला. जर्मनीत एमिली शेंक्ल या ऑस्ट्रियन युवतीने त्यांची चिटणीस म्हणून काम स्वीकारले. सुभाषबाबूंनी तिच्याशी गुप्तपणे विवाह केला. त्यांना अनिता ही मुलगी झाली. जर्मनी-इटलीमधील भारतीय सैनिकांना भेटून त्यांनी आपले मनोगत सांगितले व ब्रिटिशांविरुद्ध संघटित होण्याचे आवाहन केले. त्या वेळी जपानने ब्रिटिशांविरुद्ध रशियामध्ये आघाडी उघडली होती. बँकाक येथे जून १९४२ मध्ये भारतीयांची एक परिषद भरली होती. त्यात सुभाषबाबूंना पूर्व आशियात येऊन नेतृत्व करण्याची विनंती केलेली होती. त्याप्रमाणे जर्मनीहून जपानला येताना ते द. आफ्रिका-मादागास्करपर्यंत जर्मन यूबोटीने व पुढे सुमात्रापर्यंत जपानी पाणबुडीने गेले व पेनँग ते टोकिओ हा प्रवास त्यांनी विमानाने केला (१६ मे १९४३). जपान येथे आल्यानंतर त्यांनी स्वातंत्र्यासाठी देशाबाहेर दुसरी आघाडी तेथे उघडली.

पान ४ वर

## रंग दे बसंती सांस्कृतिक महोत्सव

# महोत्सवाची तपपूर्ती १२ वे पर्व जल्लोषात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर शहरातील सांस्कृतिक उपक्रमांमध्ये आपला वेगळा ठसा निर्माण करणारा रंग दे बसंती सांस्कृतिक म होत्सव यावर्षी पुन्हा छत्रपती संभाजीनगरातील त्रिलोकसिंग जाबिंदा लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाद्वारे शहरातील वंचित दुर्बल विद्यार्थ्यांना मागील १४ वर्षांपासून हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून दशकपूर्ती वर्षी पुणे शहरातही व्यासपीठ मिळवून देणारा 'रंग दे बसंती' हा एकमेव उपक्रम आहे.

**एक भारत, एक मंच**

एक भारत, एक मंच हे ब्रीदवाक्याला साजेसा असा हा उपक्रम अनाथ, अपंग, एडसग्रस्त तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल विशेष विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या हेतूने छत्रपती संभाजीनगर शहरात क्रेझी फ्रेंड्स ग्रुपच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधुन या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

**१३८ विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट सादरीकरण**

यंदा या सांस्कृतिक कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर शहरातील भगवान बाबा बालिकाश्रम, लायन्स बालकाश्रम, संत रोहिदास आरोग्य केंद्र, बालज्ञान मंदिर, लक्ष्य थेरपी सेंटर, गुरुवर्य लहुजी साळवे आरोग्य केंद्र, भगवान महावीर विद्या मंदिर आणि बालांकुर प्री स्कुल येथील १३८ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी सामजिक विषयावर भाष्य करीत नाटक, भाषण तसेच देशभक्तीपर गीतांवर नृत्य आणि गायन करून आपले उत्कृर्त कलागुण सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य सादरीकरण - यंदाच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे सोहळ्याचे सादरीकरण. लायन्स बालगृह येथील विद्यार्थ्यांनी अफजल खानाचा वध आणि शाहिस्तेखानाची फजिती उत्तमरीत्या सादर करून प्रेक्षकाच्या हृदयाचा ठोका चुकविला. रंगमंचावर महाराजांचा राज्याभिषेकाचा देखावा उभा राहताच प्रेक्षक टाळ्यांच्या कडकडाटात दंग झाले. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. गुरुवर्य लहुजी साळवे आरोग्य केंद्र येथील विदयार्थ्यांनी सादरीकरणात 'माऊली माऊली' या गाण्यावर नृत्य करीत पंढरीच्या वारीचे प्रत्यक्ष दर्शन उपस्थितांना घडविले, तसेच जगाचा पोशिंदा शेतकरी राजा हा संदेश देऊन सर्व प्रेक्षकांची दाद मिळवली. बालांकुर प्री स्कुलच्या चिम कल्यांनी मैत्री वर सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

तर संत रोहिदास आरोग्य केंद्र येथील विद्यार्थिनींनी नृत्यातून स्त्री-शक्तीचा जागर सादर केला, प्रस्तुत नृत्यामध्ये मुलीच्या जीवनातील प्रत्येक वळणावर होणारे विरोध ती स्फूर्तीने सामोरी जाऊन कशी यशस्वी होते, हे अचुक आणि उत्तमरित्या सादर केले. सदर सादरीकरणात विद्यार्थ्यांनी भारतीय सेनेला सन्मानार्थ सादरीकरण करत युद्धातील शहिदांना आदरांजली दिली आणि भारतीय सैन्यातील स्त्रीशक्तीचे दर्शन घडविले. सदर भावनिक सादरीकरणाने उपस्थितांना स्तब्ध केले. भगवानबाबा बालिकाश्रम, भगवान महावीर प्राथमिक स्कुल आणि लक्ष्य थेरपी सेंटरच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून कार्यक्रमातील जल्लोष टिकवून ठेवला. तर आरजे विक्रम यांनी त्यांच्या खुमासदार शैलीतील सूत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत भरली.

यांनी केले विशेष सादरीकरण

प्रसंगी दृष्टिहीन असूनही अनेक गायक घडविणारे दीपक पवार यांनी झुमो गौर से दुनियावालोंह या गाण्याने उपस्थितांचे मनोभाव जिंकले. त्यांच्या दमदार आवाजाने संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, आपला उदरनिर्वाह व्हावा म्हणून रस्त्यावर गायन करणारे दृष्टिहीन कलाकार राजेंद्र बिहरि यांनी इचिट्ठी आई हैइ हे गाणे सादर करून प्रेक्षकांना भारावून टाकले. याच समवेत रंग दे बसंती या कार्यक्रमातून अभिनयाचे धडे गिरवलेल्या आकाश गोरे या विद्यार्थ्यांने आपल्यातील अभिनय कौशल्य प्रहसनाच्या माध्यमातून उत्तमरित्या सादर केले. या विशेष सादरीकरणांनी कार्यक्रमाला अनोखे तेज प्राप्त झाले, दृढ इच्छाशक्तीने कोणत्याही अडचणींवर मात करता येते, हा संदेश सर्वांच्या मनात ठसला.

कार्यक्रमास डॉ. जीवन राजपूत, गिरीश वाकोडकर, सुनीता देसरडा, आरती अग्रवाल, ॲड. राजेंद्र मुगदिया, श्री विसानगर समाज ट्रस्ट चे पदाधिकारी, डॉ. शहादेव पाटील, भरत कल्याणकर, रुपेश कलंत्री, मनिष म हाजन, राजसिंग कौशल आदी मान्यवरांनी विशेष उपस्थिती लावली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे काव्य बरडिया, निखिलेश शिंपी, वर्धमान जैन, रोहित जाबा, सोमनाथ हिबाने, आकाश गोरे, मयुरी बसंते, पायल जाबा, किरण जाधव, राहुल पाडळकर, रोहिणी खैरे, रचना जाबा, अभिषेक आघडे, मधुरा धर्माधिकारी, तेजस जैन, दिनेश ओळेकर, दिनेश गाडवे, सयोग पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# महाकवी वामनदादा कर्डक, शिक्षण महर्षी माधवराव बोरडे जयंती उत्साहात साजरी

## सुषमादेवी यांच्या मधुर मंजुळ आवाजातील एका पेक्षा एक सरस गीताने प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाकवी वामनदादा कर्डक आणि शिक्षण महर्षी माधवराव बोरडे यांची जयंती निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात बारा गुणी व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक पोलीस आयुक्त बालाजी सोनटक्के होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आनंद इंगळे, उपायुक्त नंदकुमार भोंबे, भदंत संघपाल थेरो, डॉ. ऋषीकेश कांबळे आणि ॲड. रविकुमार तायडे, रतनकुमार साळवे उपस्थित होते.

या प्रसंगी गायिका सुषमा देवी यांना महाकवी वामनदादा कर्डक जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच एकूण बारा मान्यवरांना शिक्षण महर्षी माधवराव बोरडे व महाकवी वामनदादा कर्डक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात भीमशाहिरा सुषमादेवी, मेघानंद जाधव, अजय देहाडे, राहुल जेठे आणि स्नेहल कीर्तने यांनी एकापेक्षा एक सरस बुद्ध-भीम गीते सादर करून उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी बालाजी सोनटक्के, डॉ. आनंद इंगळे, नंदकुमार भोंबे आणि ॲड. रविकुमार तायडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निळे प्रतीक संस्थेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी करून या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. संस्थेच्या सचिव विद्या सुरडकर, सुनीता साळवे, गीतांजली पवार, कांचन आराक यांनी भिमशाहिरा सुषमा देवी यांना साडी-चोळी व रोख सहकार्य देऊन गौरव केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन गंगाताई सुरडकर यांनी मानले. स्वातंत्र्यदिनी शुक्रवारी झालेल्या या भव्य कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

# भगूर गावच्या विद्यार्थ्यांकडून नौदलासाठी देशभक्तीचा संदेश



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवारी (दि.१५) वैजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भगूर येथील विद्यार्थ्यांनी भारतीय नौदलासाठी अनोखा उपक्रम राबवला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मनापासून शुभेच्छा पत्रे व आकर्षक कार्डे तयार करून देशसेवेसाठी कार्यरत असलेल्या जवानांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. ही सर्व पत्रे सध्या रजेवर असलेल्या गावचे भूमिपुत्र नौसैनिक निलेश तुपे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सुपूर्त करण्यात आली. निलेश तुपे हे पत्रे परत सेवेत जाताना आपल्या सहकारी नौसैनिकांपर्यंत पोहोचवतील. या माध्यमातून भगूरच्या लहानग्यांनी सीमापार तैनात असलेल्या जवानांपर्यंत आपली आपुलकी व अभिमानाचा संदेश पोहोचवला. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा कृतींमुळे मुलांमध्ये देशभक्तीची भावना दृढ होते आणि आपल्या देशाच्या रक्षकांशी नागरिकांचा भावनिक संबंध अधिक मजबूत होतो. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून केलेला हा उपक्रम उपस्थित पालक व ग्रामस्थांनीही कौतुकास्पद ठरवला.

# ऑरेंज व यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी व प्रशासनाने सतर्क राहण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय हवामान विभाग, मुंबई यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार आज दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर परभणी, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी धाराशिव वगळता सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला असल्याने नागरिकांनी व प्रशासनाने सतर्क रहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी आज व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पूर परिस्थितीचा आढावा घेतला व झालेल्या नुकसानीचे योग्य प्रकारे पंचनामे करून शासनास अहवाल सादर करावा, पर्यटन स्थळे, धबधबे व गर्दीची ठिकाणे येथे स्थानिक पोलीस प्रशासनाकडून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी व आवश्यक ती काळजी घेण्यात यावी, जिल्हाधिकारी यांनी स्थानिक संभाव्य पूर परिस्थितीचा विचार करून जिल्ह्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी शाळांना सुट्टी संदर्भातील निर्णय घ्यावा, स्थलांतरित नागरिकांच्या निवारा केंद्रांमध्ये योग्य सोयी-सुविधा, अन्न व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. नागरिकांनी नदी, नाले, बंधारे, धरण परिसरात जाणे टाळावे व प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, तसेच अफवांवर विश्वास न ठेवता फक्त अधिकृत स्त्रोतांवरूनच माहिती घ्यावी असे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागात आज रोजी ३२.३० मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली असून, विभागातील ५७ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे.तसेच दि.१४.०८.२०२५ पुन १८.०८.२०२५ अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत जिल्ह्यांकडून प्राप्त प्राथमिक माहिती नुसार विभागातील एकूण १००४ गावे बाधित झालेली असून ०१ व्यक्ती जखमी तर ०६ व्यक्ती मयत (हिंगोली-०१,नांदेड-०३,बीड-०२) झालेल्या आहे.तर एकूण २०५ जनावरे मयत(दुधाळ मोठी-६९,दुधाळ लहान-१०२,ओढकाम करणारी मोठी-२८, ओढकाम करणारी लहान-०६) झालेली आहे.तर अंशतः पडझड झालेल्या घरांची संख्या एकूण - ४८६ आहे. शेती पिक नुकसानीच्या प्राथमिक माहिती अहवालानुसार एकूण ३,२९,५०९ शेतकरी बाधित झाले असून २,८०,८६१.०२ हे.आर क्षेत्राचे (जिरायत-२७२५०७.०२,बागायत-८१५८,फळपीक-१९६ हे.आर) नुकसान झाले आहे.

# म्हाडाच्या १३४१ सदनिका/भुखंड सोडतीचे अर्ज भरण्यासाठी शेवटचे १२ दिवस शिल्लक जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधी लाभ घेण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

म्हाडाच्या १३४१ सदनिका/भुखंडाच्या जुन-२०२५ प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज भरण्यासाठी शेवटचे १२ दिवस शिल्लक आहेत त्यामुळे अर्जदारांनी लवकरात लवकर अर्जाचा भरणा करून या सुवर्णसंधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी दत्तात्रय नवले यांनी म्हाडा सोडतीच्या अनुषंगाने जास्तीत जास्त नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे सोडत जुन-२०२५ साठी अर्जदारांना दि.३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री. ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अनामत रक्कमेचा भरणा करून ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अर्जाची दि.२६ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सोडत काढण्यात येणार आहे. अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता https://housing.mhada.gov.in किंवा https://www.mhada.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. या सोडतीकरिता मंडळातर्फे अर्ज नोंदणीकरिता- ०२२-६९४६८१००, ऑनलाईन पेमेंट करिता-१८००८९१८२९७,७०६६०४७२१२ हेल्पलाईन क्रमांक व support@easebuzz.in ईमेल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. या सोडतीकरिता मंडळाने अर्जदारांकरिता विभागीय कार्यालय गृहनिर्माण भवन, सि.बी.एस. रोड, महाविर स्तंभाजवळ, छत्रपती संभाजीनगर तळम जल्यावर विशेष मदत कक्ष स्थापन केलेला आहे.

# नशामुक्त छत्रपती संभाजीनगर हा दिशादर्शक उपक्रम ठरेल- उपमुख्यमंत्री अजित पवार

## लोकप्रतिनिधी- प्रशासन व तज्ञ एन.जी.ओ.मिळुन पाणी नियोजन करा!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरात करावयाच्या विकास कामांचे आधी नियोजन करा हे नियोजन परिपुर्ण झाल्यानंतर निधीची मागणी करा नंतर दर्जेदार कामे करा व जनतेला उत्तम सुविधा द्या त्यासाठी शासन आपल्या नेहमी सोबत आहे, असे आश्वासन आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छत्रपती संभाजीनगर करांना दिले.

येथील श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे उत्सव साजरे करण्याचे हे १०१ वे वर्ष असून यंदा २०२५-२६ या वर्षाचे मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल जवळ खोकडपुरा येथे हा कार्यक्रम पार पडला. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, आ.प्रदीप जैस्वाल,विधान परिषद सदस्य आ.सतिष चव्हाण, आ.विक्रम काळे,आ.संजय केणेकर, श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराजभाऊ पवार,विद्यमान अध्यक्ष अनिकेत प्रकाश निल्लावार,पोलीस आयुक्त प्रवीण पवार,कार्याध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील,डी एन पाटील,अभिजीत देशमुख, तनसुख झांबड, राजेंद्र दानवे, अनिल मकरीये,अनिल बोरसे, हरीश शिंदे,शिवाजी कवडे,महेश उबाळे,बाळासाहेब थोरात, नंदकुमार घोडेले,अॅड सय्यद अक्रम, सचिन खैरे,सुमित खांबेकर,अॅड सुवर्णा मोहिते, सुरेश टाक,किशोर तुलसीबागवाले,

उल्हास नरवडे पाटील, मोहित जाधव,परेश अग्रवाल,ऋतूपर्ण गायकवाड, शिवा ठाकरे, प्रशांत जोशी, गयास बागवान,नितीन महाजन, महेश बोरसे, सुधीर शेवाळे, स्वरूप जाधव, सोनु खंडागळे, अविनाश खंडागळे, शेख फैजान,विकिराज पाटील,संग्राम अतकरे, शिवा ठाकरे,अजय कागडा, दिपराज शस्त्राकार, सचिन आधापुरे, ऋतुपर्ण गायकवाड,अविनाश जाधव, सचिन रिडलॉन,सोमेश चव्हाण, शिवाजी कायंदे, अभिषेक खंडागळे, सय्यद शौकत यासह प्रतिभा निल्लावार, सोनाली मनगटे, कल्याणी चिंतावार,सुषमा गड्डम,पूर्वा गादेवार, अमृता चव्हाण,श्वेता चक्करवार,जया सुरासे, स्वाती नेवारे सुनिता चव्हाण, वैशाली चक्करवार, कविता शिंदे, विशाखा निल्लावार,रंजना जाधव तसेच अन्य पदाधिकारी व गणेश प्रेमी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या आपल्या मार्गादर्शनात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले की,जनतेची कामे ही दर्जेदार व्हायला हवीत. निधी योग्य पद्धतीने खर्च झाला पाहिजे. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात करावयाच्या कामांचे नियोजन आधी सर्व लोक प्रतिनिधी सह प्रशासन आणि तज्ञ एन जी ओ आदींनी मिळून करावे. त्यानंतर प्रस्ताव द्या. योग्य कामाला निधीची कमतरता पडू देणार नाही. शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे बाधित झालेल्यां नाही पर्यायी सुविधा उपलब्ध करुन द्या.छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच एक २००कोटी रुपये खर्चून उद्योगासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ देण्यासाठी इनक्युबेशन सेंटर तयार करण्याची योजना आहे,असेही त्यांनी सांगितले.

खुलताबाद येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी व शहरातील पाणी पुरवठ्यासाठी लोक प्रतिनिधी व प्रशासन आणि अनुभवी व तज्ञ एन जी ओ आदींनी मिळून नियोजन एक देखरेख समिती स्थापुन करावे व त्या द्वारे परिपूर्ण प्रस्ताव तयार करा,असे निर्देशही त्यांनी दिले. या भव्यदिव्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे जेष्ठ कार्याध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले. प्रास्ताविक विक्की जाधव यांनी केले तर आभार तनसुख झांबड आणि सचिन अंभोरे यांनी केले.

गणेश महासंघाच्या उपक्रमात वृक्ष लागवड उपक्रमाचे स्वागत करुन प्रत्येक सदस्याने एक झाड लावावे असे आवाहन त्यांनी केले.नशामुक्त अभियान राबवुन युवकांना योग्य दिशा देण्याच्या उपक्रमाचेही त्यांनी कौतुक केले. कुस्ती स्पर्धा, ढोल ताशा स्पर्धा, स्वच्छता अभियान, निर्माल्य व्यवस्थापन आदी उपक्रम राबवण्यात अग्रक्रमाचे त्यांनी कौतुक केले. ग्राफिक डिझाईनर ओंकार देशपांडे आणि सहकाऱ्यांनी तयार केलेल्या कल्पक बॅनरची दिशादर्शक मांडणी चर्चेचा विषय ठरली आहे.

# तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आज दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ज्ञान संदिप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर सिडको एन ७ छत्रपती संभाजी नगर येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या हर्ष उल्हासमध्ये संपन्न करण्यात आला. सर्वप्रथम संस्थेच्या सचिव श्रीमती. संगीता खिल्लारे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर याच्या आणि सर्वच महामानवाच्या प्रतिमेला व पुष्पहार अर्पण करून राष्ट्रध्वजास पुष्प वाहून पूजन केले त्यानंतर शाळेच्या क्रीडांगणावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्याध्यापक श्री.प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संदीप सोनवणे ज्ञान संदिप प्राथमिक माध्यमिक विद्यालय मिसरवाडी चे मुख्याध्यापक श्री अभिजित सोनवणे, बी.बी.शिन्दे अंगणवाडी सेविका श्रीमती. माया भिवसाने व सुमित्रा साळवे यांच्यासह अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

ध्वजारोहणानंतर शाळेच्या क्रीडांगणावर इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर नृत्य सादर करून आणि विविध कवायती सादर करून उपस्थितांचे मन जिंकले स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध स्पर्धा त्यामध्ये लिंबू चमचा संगीत खुर्ची दोरीवरील उड्या तीन पायाची शर्यत वकृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा यामधील विजयी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील वरिष्ठ शिक्षक सुनील चौधरी, संजय चौधरी, विजय पाटील, श्रीमती नाझिमा खान, वैशाली बागुल, कोमल रगडे, रत्नमाला घोरपडे, वैशाली बोराडे, मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे, अजयकुमार खिल्लारे, किरणकुमार सोनवणे, स्वामी जाधव, गौतम मकासरे, विजय आघाव, शेख नय्युम यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी मांडले शेवटी संस्थेच्या सचिव श्रीमती संगीताताई खिल्लारे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मिठाई वाटप केले.

# तब्बल ३९ वर्षांनी भरली जुन्या वर्ग मित्रांची शाळा जुन्या आठवणींना दिला उजाळा

## निसर्गमय वातावरणात घेतला भोजनाचा आनंद



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजी नगर शहरातील वर सिडको एन ९ येथील बळीराम पाटील विद्यालयातील इयत्ता दहावी १९८६ च्या बॅचच्या सर्व मित्र मैत्रिणींची तब्बल ३९ वर्षानंतर पुन्हा शाळा भरली होती. यावेळी त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन निसर्गमय वातावरणात वनभोजनाचा आनंद लुटला.

म्हैसमाळ येथील श्री बालाजी मंदिर व गिरजा माता मंदिर ला भेट देऊन निसर्गाच्या सानिध्यामध्ये एकूण ४० मित्र-मैत्रिणींनीने अतिशय आनंदमय वातावरणामध्ये रविवारचा दिवस मोठ्या उत्साहात घालवला. सर्वप्रथम म्हैसमाळ येथे एकत्र येऊन आपल्या बॅचमधील निधन झालेल्या मित्र व वर्गमैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दुपारी सर्वांनी एकत्रितपणे स्नेहभोजन घेतले आणि त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला त्यामध्ये देशभक्तीपर गीते चित्रपटातील विविध मराठी हिंदी गाणी गायली सामुदायिक नृत्य केले.

यामध्ये सर्वांनी चढाओढीने भाग घेतला . प्रत्येकाने आपापली कला सादर केली.आम्हाला दहावीच्या वर्गाची आठवण आल्याशिवाय राहिली नाही. या गेट-टुगेदर मध्ये ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे अमोल पाटील महेंद्र दत्ता गावंडे किशोर राऊत अंबादास सोनवणे डॉ.योगेश वडगांवकर राजेंद्र पवार सुनंदा गिरधारी उषा कांबळे संजय कुलकर्णी गजानन देशमुख विजय साळवे विद्या महाजन पीएसआय अशोक काळे अंकुश दानवे गोविंद लवांडे चंद्रकांत आव्हाड बाबासाहेब काळे समाधान सुरडकर भगवान मस्के संतोष देशपांडे प्रकाश सोनवणे प्रकाश डोंगरे नंदा पठाडे नामदेव डांबरे राजू घोडके भारती आहेर (मोरे) पंजाबराव राठोड भारती भोसले (मोरे) सीमा थोरात (आवटे ) संजय फरकाडे सुलभा घाग संतोष कुंटे सरपंच आय्युब खान मनोज वैद्य अरविंद लंके कल्पना सेशवरे यांची उपस्थिती होती. जीवनामध्ये सर्वांनी मित्र जोपासले पाहिजेत व सर्वांच्या सुखदुःखामध्ये सहभागी झाले पाहिजे व प्रत्येकाच्या सुखदुःखाची चौकशी आवर्जून केली पाहिजे तरच आपल्या जीवनाचं सोनं झाल्याशिवाय राहणार नाही असे मत प्रा. प्रकाश सोनवणे यांनी व्यक्त केले.

पान २ वरून

# पूर्ण स्वातंत्र्याची मागणी लावून धरणारे-सुभाषचंद्र बोस

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना करण्यात आली. सुभाषबाबू स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती झाले. या शासनाला जपान, जर्मनी, इटली, ब्रह्मदेश आदी अकरा राष्ट्रांनी मान्यता दिली. या सरकारने इंग्लंड-अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारून स्वतःची तिकिटे व नोटाही काढल्या. जपानने अंदमान, निकोबार व जित बेटांचा ताबा या सरकारकडे सोपविला. ब्रह्मदेशामधून आझाद हिंद सेना भारताच्या दिशेने पुढे गेल्या. इंफाळ येथे लढाईला तोंड फुटले; परंतु तेथे आझाद हिंद सेनेला नैसर्गिक आपत्तींमुळे माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणीवरून सुभाषबाबूंनी भाषण करून ब्रिटिशांशी कोणत्याही प्रकारचा समझोता न करण्याचे, फाळणी न स्वीकारण्याचे व लढा चालू ठेवण्याचे देशबांधवांना आवाहन केले (१२ सप्टेंबर १९४४). शिवाय युद्धात पराजय होत असतानासुद्धा नीतिधैर्य खचू न देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. महायुद्धात जर्मनी-इटली व नंतर जपानचा पराभव झाला; जपानने १५ ऑगस्ट १९४५ रोजी शरणागती पत्करली. त्या वेळी त्यांनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. मांचुरियाहून त्यांना धाडण्याची व्यवस्था फिल्ड मार्शल ताराऊ याने केली. सायगावहून १७ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांनी प्रयाण केले. मार्गावर १८ ऑगस्ट रोजी तैपे (तैवान) येथील विमानतळावर विमानास अपघात होऊन सुभाषबाबूंचे निधन झाले, असे समजण्यात येते. या अपघाताची कारणे अशी होती, विमानात एकूण ९ माणसांऐवजी १३ उतारू घेतले होते.

विमानतळ तुलनात्मकदृष्ट्या फार छोटा होता आणि या वेळी वैमानिकाची मनः स्थिती अस्थिर व भांबावलेली होती. शिवाय वैमानिकाने फॉर्मोसा विमानतळाचा कधीच अनुभव घेतला नव्हता. जपानने शरणागती पत्करल्यामुळे मानसिक धक्का बसला. २,६०० वर्षांत जपानचा हा पहिलाच पराभव होता. सरकार असून नसल्यासारखे - यामुळे निधनाची वार्ता जाहीर केली नाही. निधनाचे वृत्त दीर्घ काळ अज्ञात राहिल्यामुळे लोकांत पुढे शंका निर्माण झाली. सुभाषबाबूंचे एकूण जीवनच देशभक्त क्रांतिकारकाचे व म्हणून रोमांचकारी आहे. परदेशात जाऊन इतर मित्रराष्ट्रांच्या साह्याने त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले, हे त्यांच्या धडाडीचे, संघटना कौशल्याचे, समयसूचकतेचे व मुत्सद्देगिरीचे निदर्शक आहे. दास्यमुक्तीसाठी आणि नंतरच्या प्रगतीसाठी त्यांनी अनेक योजना आखल्या आणि त्या कार्यवाहीत आणण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले.

प्रकृतीची पुरेशी साथ नसतानाही त्यांनी उपोषण-निदर्शनांपासून सशस्त्र युद्धापर्यंतचे सर्व मार्ग आचरणात आणले. त्यासाठी त्यांनी म. गांधीपासून स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांपर्यंतच्या सर्व नेत्यांचे प्रसंगोपात्त सहकार्य स्वीकारले. त्यांचा स्वभाव दृढनिश्चयी व प्रसंगी कठोरही होत होता; तथापि त्यांचे वागणे मात्र सौजन्यशील व सौहार्दाचे असे. मूळात त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे होता. दूरदृष्टी, जबरदस्त, आत्मविश्वास, धडाडी आणि निर्भयता यांमुळे कोणत्याही प्रसंगी ते डगमगले नाहीत. आझाद हिंद सरकारच्या स्थापनेनंतर त्यांनी स्वीकारलेले राष्ट्रगीत हेच स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत बनले. त्यांची भाषणे, पत्रे, स्फुटलेखन इ. स्वातंत्र्योत्तर काळात-१९६५मध्ये समग्ररीत्या प्रसिद्ध झाले. अॅन इंडियन पिल्ग्रिम: अॅनब अनफिनिशड ऑटोबायॉग्रफी अँड कलेक्टेड लेटर्स- १८९७-१९२१ हे त्यांचे आत्मवृत्त प्रसिद्ध झाले आहे. !! नेताजींना त्यांच्या पावण पुण्यस्मरण निमित्त विनम्र अभिवादन जी !!

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199